महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/१६६९ दिनांक : ३०.०३.२०२१

<u>महत्वाचे परिपत्रक (गुणवत्ता यादी तपासणी - पदवी/पदव्युत्तर पदवी)</u>

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/
व्यवस्थापनशास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...

संदर्भ :
१) महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दिनांक १७/०८/२०१५
२) मा.सचिव , प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण /२२२१/प्र.क्र.०१/प्रनिप्रा/१८६ दिनांक ०८/०२/२०२१
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.२ अ/एडीएम/२०२१/८७ दि. ११.०२.२०२१.
४) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/१०२२ दिनांक २५.०२.२०२१
५) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/१६४८ दिनांक २६.०३.२०२१

संदर्भ क्रमांक ४ मधील परिपत्रकानुसार, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या जिल्ह्यांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील **पदवी व पदव्युत्तर पदवी** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र इत्यादी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादी पडताळणी संबंधित जिल्ह्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये करण्यात आलेली आहे.

कोव्हीड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेल्या दिनांक २७.०३.२०२१ च्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन **सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या** संस्थांना सूचित करण्यात येते की, संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या तपासणी केंद्रांकडून प्रवेश गुणवत्ता यादी तपासून घेतल्यानंतर **काही कागदपत्रांच्या त्रुटी राहील्या असतील तर त्यांनी सदर त्रुटी त्याच तपासणी केंद्रांकडून दिनांक ३१.०३.२०२१ पूर्वी तपासून घेऊन त्यांची पूर्तता करावी.** तदनंतर या विभागीय कार्यालयाकडे तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता **दिनांक ०२.०४.२०२१ पूर्वी** या विभागीय कार्यालयाकडे गुणवत्ता यादांची फाईल्स चेकलिस्टप्रमाणे कागदपत्रे तपासून घेऊन जमा कराव्यात. **०२.०४.२०२१ पूर्वी ज्या संस्था या विभागीय कार्यालयाकडे फाईल्स जमा करणार नाहीत अशा संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

30/03/21

(एम. आर. जाधव)
सहायक संचालक (तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

..Yogesh Kelkar\Admission 2020-21\Degree Admission\Merit list\Merit list letter and cirucular.docx